# ग्रामपंचायत विभाग ,जिल्हा परिषद पालघर

कार्यालयाचा पत्ता : रुम नं. ६, जिल्हा परिषद पालघर, कोळगावरोड, ता. जि. पालघर ४०१४०४
**E-mail:** vpzppalghar@gmail.com

वाचा:-

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७.
२. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१२ दि. ०१/०७/२००५ (लहान कुटूंब प्रतिज्ञापत्र)
३. ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक दिव्यांग -२०१९/ प्र.क्र. १४१/आस्था-८ दि. ०८/०४/२०२१ (पदे सुनिश्चीत )
४. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रनिमं १२२२/ प्र.क्र. १४/ का.१३ अ दिनांक ०४ मे २०२२(सरळसेवा भरती)
५. ग्रामविकास विभाग यांचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.११/आस्था-८ दि. २१/१०/२०२२ (रिक्त पदे भरण्याबाबत)
६. वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रं.पदनि-२०२२/प्र.क्रं.२/२०२२/आ.पु.क.दि. ३१/१०/२०२२ (८० % पदभरती)
७. ग्रामविकास विभाग यांचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.११/आस्था-८दि. १५/११/२०२२ (रिक्त पदे भरण्याबाबत)
८. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/ प्र.क्र. १३६/का-१३ ब दि.२१/११/२०२२(कंपनी निवडणे)
९. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक.प्रनिम १२२३/ प्र.क्र. १४/का-१३ अ दि. १४/०२/२०२३(परिक्षा शुल्क)
१०. ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक - संकीर्ण २०२२/प्र.क्र.११/आस्था-८, दि. १५/०५/२०२३ (सरळसेवा भरती एकत्रित)
११. जिल्हा परिषद सर्वसाधारण भरती जिल्हा परिषद, पालघर जाहिरात ०१/२०२३ दिनांक ०५ ऑगस्ट, २०२३(जाहिरात)
१२. IBPS यांचे पत्र क्र.२६०८ दिनांक १२.०९.२०२४
१३. सामान्य प्रशासन विभाग ,महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०२३ /प्र.क्र.५४/आरक्षण ५ दि.५/१०/२०२४
१४.सामान्य प्रशासन विभाग ,महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०२३ /प्र.क्र.५४/आरक्षण ५ दि.११/०२/२०२६
१५. ग्रामविकास व पंचायतराज विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र/पदभ/३१२४ प्रक्र.२८५/आस्था ८ दि.१८.०२.२०२६
१६. कार्यालयीन मंजुर टिपणी

जा.क्र./पाजिप/ग्रापं/कार्या-२/वशी/१६१ /२०२६      दिनांक :-२६ / ०२ /२०२६

**आदेश**

संदर्भिय पत्र क्रमांक १३ नुसार अनुसुचित क्षेत्रातील ( पेसा ) १७ संवर्गातील सरळसेवेची पदे मानधन तत्वावर नेमणुका करुन रिक्त पदे तातडीने भरण्याकरीता कळविलेले होते.त्यानुसार अनुसुचित क्षेत्रातील ( पेसा ) पदे भरण्यासाठी जाहिरातीद्वारे निवड राबविण्यात आलेल्या प्रक्रीयेमध्ये गुणवत्तेने पात्र ठरलेल्या उमेदवारांची विशेष बाब म्हणुन मानधन तत्वावर नेमणुक करण्यास संवर्गनिहाय प्रशासकीय विभागांना परवानगी देण्यात आलेली होती.

जिल्हा परिषद,पालघर सरळसेवा भरती प्रक्रीया-२०२३ अंतर्गत आय.बी.पी.एस. कंपनीकडून घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेच्या प्राप्त गुणवत्ता यादीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी गुणवत्तेनुसार उमेदवारांची अंतिम निवड यादीस मान्यता देण्यात आल्याने पात्र उमेदवारांची कंत्राटी ग्रामसेवक (पेसा ) या पदावर विशेष बाब म्हणून प्रथम नियुक्तीच्या वेळी मिळणा-या एकत्रीत मानधन रु.१६०००/- इतक्या मानधन तत्वावर नियुक्ती करण्यात आलेली होती. सदरची रक्कम ही नियमीत वेतन नसुन मासिक मानधन होते. तसेच मानधन तत्वावर दिलेल्या नेमणुका मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका २२१०९/२०२३ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून त्यांची पदस्थापना जिल्हा परिषद, पालघर अंतर्गत अनुसुचित क्षेत्रातील (पेसा) रिक्त ग्रामपंचायतींच्या पदावर करण्यात आलेली होती.

संदर्भ क्र.१४ नुसार मा.सर्वोच्च न्यायालयाने पेसा क्षेत्रातील पदभरती संदर्भातील याचिकांवर दि. ०६/१०/२०२५ व दि.१७/११/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पेसा क्षेत्रातील १७ संवर्गातील पदभरतीबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच ग्रामविकास व पंचायतराज विभागाकडील संदर्भ क्र.१५ च्या प्राप्त पत्रानुसार संदर्भ क्र.१४ च्या शासन निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही करणेबाबत नमुद केलेले आहे.

त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाकडील दि.११ फेब्रुवारी, २०२६ च्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या तरतूदीनुसार खालील नमुद केलेल्या उमेदवारांना नेमणुकीच्या अटी व शर्तीस अधिन राहुन या आदेशाच्या दिनांकापासुन **कंत्राटी ग्रामसेवक** (पेसा) या पदावर त्यांची पदस्थापना पुढील तीन वर्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात दिनांक १८ जुलै २०२३ चे शासन निर्णयानुसार दरमहा रु.१६०००/- एकत्रीत मानधनावर जिल्हा परिषद पालघर अंतर्गत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी अनुसूचित क्षेत्रामधील (पेसा) ग्रामपंचायतीच्या रिक्त पदावर करणेत येत आहे.

तसेच कंत्राटी ग्रामसेवक (पेसा) या तात्पुरत्या स्वरुपात दिलेल्या नेमणुका मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २२१०९/२०२३ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मुळ प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग (पदस्थापनेचा प्रवर्ग) | समांतर आरक्षण | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | हरिश्चंद्र रामू मौळे | अ.ज. | अ.ज. | सर्वसाधारण | ग्रा.पं.आपटाळे,ता.जव्हार |
| २ | विराज सोनू भोये | अ.ज. | अ.ज | सर्वसाधारण | ग्रा.पं.वाडा खडकोना ता.पालघर |
| ३ | श्री.वैभव सुरेश चौधरी | अ.ज. | अ.ज | सर्वसाधारण | ग्रा.पं.नांदगाव, ता.जव्हार |
| ४ | श्री.अविनाश बानु दुबळा | अ.ज. | अ.ज. | सर्वसाधारण | ग्रा.पं.मेंढवण ता.पालघर |
| ५ | श्री.शामसुंदर नंदकुमार जाधव | अ.ज. | अ.ज. | सर्वसाधारण | ग्रा.पं.बोटोशी, ता.मोखाडा |
| ६ | श्रीम.तेजस्वी मधुकर खाचे | अ.ज. | अ.ज. | महिला | ग्रा.पं.बिलघर, ता.वाडा |
| ७ | श्रीम.कल्याणी संजय चौधरी | अ.ज. | अ.ज. | महिला | ग्रा.पं.शेले, ता.वाडा |
| ८ | श्रीम.राजश्री नामदेव शिंदे | अ.ज. | अ.ज. | महिला | ग्रा.पं.चांभारशेत, ता. जव्हार |
| ९ | श्रीम.करिष्मा नितीन धोडी | अ.ज. | अ.ज. | महिला | ग्रा.पं.गुंगवाडा, ता.डहाणू |
| १० | श्रीम.प्रतिक्षा संतोष राठोड | अ.ज. | अ.ज. | महिला | ग्रा.पं.दापचरी, ता.पालघर |
| ११ | श्रीम.सुनिता समीर काळे | अ.ज | अ.ज. | महिला | ग्रा.पं.साखरे, ता.विक्रमगड |
| १२ | श्रीम.अविष्का विलास सुतार | अ.ज. | अ.ज. | महिला | ग्रा.पं.वरसाळे, ता.वाडा |
| १३ | श्रीम.कविता विष्णु कोंगिल | अ.ज. | अ.ज. | महिला | ग्रा.पं.खुडेद, ता.विक्रमगड |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | श्री.प्रियेश दिनेश धोडी | अ.ज | अ.ज. | अंशकालीन कर्मचारी उपलब्ध न झाल्याने सर्वसाधारण | ग्रा.पं.कोगदा, ता.जव्हार |
| १५ | श्री.जयवंत दिनकर खाडे | अ.ज. | अ.ज. | | ग्रा.पं.उथळे, ता.मोखाडा |
| १६ | श्री.संदेश शंकर दळवी | अ.ज. | अ.ज. | | ग्रा.पं.बोरांडा, ता विक्रमगड |

अटी व शर्ती :-

१. कंत्राटी ग्रामसेवक (पेसा) या तात्पुरत्या स्वरुपात दिलेल्या नेमणुका मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २२१०९/२०२३ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहेत.

२. आदेश निर्गमित झाल्यापासुन ३० दिवसांचे आत उमेदवारांनी नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. उमेदवार ३० दिवसांचे आत नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास त्याची नियुक्ती आपोआप रद्द होईल व त्याऐवजी प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करणेत येईल.

३. नेमणुकीच्या जागी हजर होणेसाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

४. वरील नेमणुक कंत्राटी स्वरुपाची असुन आपणांस मिळणारी रक्कम ही वेतन नसुन मासिक मानधन आहे.आपणांस जिल्हा परिषद सेवेतुन कोणत्याही प्रकारची सुचना न देता अगर कारण न दर्शविता सेवेतुन कमी करण्यात येईल. त्याकरीता खालील प्रमाणे उमेदवारांनी संमतीपत्र देणेबंधनकारक आहे.

मी श्री / श्रीम. ----------------------------राहणार --------- प्रतिज्ञापत्र लिहुन देतो/देते की, जिल्हा परिषद सेवेत माझी ज़िल्हा सेवा कंत्राटी ग्रामसेवक पदावर झालेली नियुक्ती ही एकत्रीत मानधन रु. १६०००/- याप्रमाणे असेल.सदर नियुक्ती पुर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाची असुन ती कोणतेही कारण अथवा नोटीस न देता संपविण्याचा जिल्हा परिषदेला पुर्ण अधिकार असुन त्या अटीवर मी ही नेमणुक स्विकारत आहे. हे संमतीपत्रक मी स्वखुशीने लिहुन देत आहे.

५. उमेदवारास जिल्हांतर्गत कोठेही नियुक्तीच्या ठिकाणी काम करणे बंधनकारक राहील.

६. उमेदवारास जिल्हा परिषद सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिन्याची आगावू नोटीस दयावी लागेल. आगावू नोटीस न दिल्यास एक महिन्याचे मानधनाची रक्कम भरावी लागेल.

७. संबंधित उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी मुख्यालयी वास्तव्य करणे बंधनकारक राहील.

८. जिल्हा परिषदेच्या सुधारीत आकृतीबंधामध्ये सदर संवर्गाची पदे कमी झाल्यास कोणतीही पुर्व कल्पना न देता आपणास जिल्हा परिषद सेवेतुन कमी करण्यांत येईल.

९. सदरहू उमेदवाराने नेमणूकीच्या ठिकाणी हजर झाल्यानंतर शारिरिक दृष्टया काम करण्यास पात्र असलेबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांचेकडील प्रमाणपत्र २ महिन्याच्या आत सादर करावयाचे आहे.उमेदवार शारिरीक दृष्टया काम करण्यास अपात्र ठरल्यास त्याची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१०. अर्जासोबत उमेदवारांनी सादर केलेले कोणतेही पुरावे/कागदपत्रे अन्यथा माहीती भविष्यात खोटी आढळुन आल्यास त्याची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल व संबंधीतांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

११. उमेदवारास सुरक्षाठेव म्हणुन रु.१०,००० /-(अक्षरी रु.दहा हजार फक्त ) एवढी रक्कम हजर होतेवेळी संबंधित गटविकास अधिकारी यांच्याकडे भरावी लागेल व दोन प्रतिष्ठित व्यक्तीचे जामीन पत्र (रु ५००/- चे कोर्ट स्टॅम्प पेपरवर) लिहून द्यावे लागेल.

१२. नियुक्तीच्या कालावधी मध्ये आपण कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तणूक केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१३. सदर आदेशान्वये नियुक्ती दिल्यानंतर संबंधितांचे नियुक्तीबाबत आक्षेप प्राप्त झाल्यास व प्राथमिक चौकशीअंती त्यात तथ्य दिसुन आल्यास देण्यांत आलेली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही वेळी रद्द करण्यांत येईल.

१४.महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नियुक्तीसाठी अधिसुचनेत विहीत केलेली लहान कुटुंबाची अतिरिक्त अट लागु झालेली आहे.त्या अनुषंगाने नियमातील नमुना अ नुसार उमेदवारांकडुन प्रतिज्ञापत्र

कार्यालय प्रमुखाने भरुन घ्यावे सदर नियमानुसार दिनांक २८.०३.२००६ नंतर तिसरे अपत्य असणाऱ्या उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१५. उमेदवार विवाहित असल्यास उमेदवारास एकच पती/पत्नी आहे असे समजण्यात येईल एकापेक्षा अधिक पती / पत्नी आढळुन आल्यास उमेदवाराची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१६. उमेदवाराची नियुक्ती जिल्हा पोलिस आयुक्त/पोलिस अधिक्षक यांच्याकडील चारित्र्य पडताळणी अहवालास अधिन राहिल.या बाबतचा अहवाल दोन महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.अहवालात काही आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्यास सदरची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल. चारित्र्य -पुर्वचारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळुन आल्यास संबंधीत उमेदवार नियुक्तीसाठी / सेवेसाठी पात्र राहणार नाही तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील.

१७. जिल्हा परिषद सेवेत असतांना अगर रजेच्या मुदतीत कोणताही व्यवसाय, धंदा अगर इतरत्र नोकरी करता येणार नाही.

१८. जाहिरातीमधील काहि मुद्दे शासनाच्या निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णयातील तरतुदी अंतिम राहील.

१९. कंत्राटी ग्रामसेवक या पदावर ३ वर्ष समाधानकारक सेवा केल्यानंतर आपणांस ग्रामसेवक नियमित पदावर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्याबाबत विचार करता येईल.

२०. जिल्हा परिषद कर्मचारीकरीता शासनाने वेळोवेळी विहीत केलेले सर्व नियम व अटी नव्याने रुजु झालेल्या उमेदवारास लागू व बंधनकारक आहेत.

२१. ज्या उमेदवाराची जात पडताळणी झालेली नाही त्यांनी सेवेत लागल्यापासुन ६ महिन्यात जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे. अन्यथा त्यांची सेवा कमी करणेत येईल.

मनोज रानडे (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,पालघर

**प्रतिलिपी :-**

१. मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांना माहितीसाठी सादर.

**प्रतिलिपी :-** माहिती तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित.

१. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, पालघर/ वैदयकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय..............
२. मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी,जिल्हा परिषद पालघर.
३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) जिल्हा परिषद पालघर.
४. गटविकास अधिकारी , पंचायत समिती पालघर,डहाणू,वाडा,विक्रमगड,जव्हार व मोखाडा.

२/- आदेशातील अनुक्रमांक १ ते २१ वर नमुद अटी व शर्ती उमेदवारास मान्य असल्याचे हमीपत्र लिहून घेवूनच संबंधितास रुजु करुन घ्यावे. व तसा अहवाल या कार्यालयास उलट टपाली सादर करावा.

५. श्री./श्रीम. .................................. यांना पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

मनोज रानडे (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,पालघर